

छाया : रघुनंदन मुजुमदार.

# गिल, राव, घोष, बालू यांच्यात चुरस

**नाशिक (वार्ताहर) :- बूंम - बूंम करीत एकामागून एक सुसाट वेगाने धावणाऱ्या कार्स्‌चा थरार वेग आणि नियंत्रण याचा योग्य समन्वय साधून त्या चालवणारे चालक व प्रेक्षकांचा प्रचंड उत्साह, अशा वातावरणात रॅली ऑफ महाराष्ट्राचा पहिला टप्पा काल सायंकाळी फाळके स्मारक येथे पार पडला. २००० सी.सी. मध्ये मित्सुबिशी सिडीया कार घेऊन रॅलीत सहभागी झालेला मागील वर्षाचा विजेता गौरव गिल, अर्जुन राव, अमितसिंग घोष व अर्जुन बालू यांनी १ मिनिट ४५ सेकंदाची नोंद करीत स्पर्धेतील चुरस वाढली आहे.**

वेस्टर्न इंडिया स्पोर्टस्‌ असोसिएशनच्या (विसा) आयोजित स्पीड आय.एम.आर.सी. रॅलीची पहिली फेरी नाशकात होत असून या रॅलीचा पहिला टप्पा खास नाशिककरांसाठी फाळके स्मारक येथे पार पडला. या रॅलीतील कारचा थरार पाहण्यासाठी प्रेक्षकांनी गर्दी केली होती.

सायंकाळी ४.४० वाजता रॅलीला झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. जिप्सी गटातील गाड्यांनी रॅलीस सुरुवात झाली. जिप्सी गटात एकूण ७ स्पर्धकांनी सहभाग घेतला. यात सचिन सिंग याने सर्वात कमी वेळात (२ मि. ०७ सेकंद) नोंदवत आघाडी घेतली तर मारुती इस्टीम गटात अश्विन गोवडा याने २ मि. ०२ सेकंद वेळेची नोंद करीत बाजी मारली. १६०० सी.सी. गटात २ मिनिटांत अंतर पूर्ण करीत अनिरुद्ध रांगणेकर याने आघाडी घेतली.

२००० सी.सी. मध्ये मित्सुबिशी सिडीया कार घेऊन रॅलीत सहभागी झालेला मागील वर्षाचा विजेता गौरव गिल, अर्जुन राव, अमितसिंग घोष व अर्जुन बालू यांनी १ मिनिट ४५ सेकंदाची नोंद करीत स्पर्धेतील चुरस वाढविली. या सर्वांनी एकाच वेळेत अंतर पार केल्याने पुढच्या टप्प्यात होणारी स्पर्धा चुरशीची होणार याचे संकेत मिळाले आहेत.

### प्रेक्षकांचा उत्साह

रॅलीला प्रारंभ झाल्यावर गेल्या वर्षापेक्षा प्रेक्षकांची संख्या कमी असली तरी उत्साह दुणावला होता. प्रत्येक कारच्या चालकास ते जोरजोरात ओरडून प्रोत्साहन देत होते. त्याचप्रमाणे रॅलीच्या मार्गावर जाणाऱ्या प्रेक्षकांना आरडाओरडा करीत बाजूला जायला सांगत होते. याच दरम्यान फाळके स्मारकात फक्त फिरायला आलेल्या नागरिकांची तारांबळ होताना दिसत होती. रॅलीमुळे घरी जाण्यास अडथळा निर्माण झाल्याने त्यांनीही रॅलीचा आनंद घेतला.

### गौरव गिलचे आकर्षण

या स्पर्धेत पहिल्यापासून प्रेक्षकांचे आकर्षण ठरला तो गेल्यावेळचा विजेता गौरव गिल. त्याची सिडीया कार सगळ्यात शेवटी सोडण्यात आली. त्यामुळे सगळे प्रेक्षक त्याची गाडी कधी येणार याची वाट पाहताना दिसत होते. गौरवनेही आपली गाडी सुसाट नेताना ज्या वळणावर एकूण तीन गाड्या गवताच्या गंजीत घुसल्या, तेथे आपल्याकडील वेग व नियंत्रण याचा अनुभव पणाला लावत अगदी वेगळ्या पद्धतीने तेथून वेगात गाडी नेत प्रेक्षकांची वाहवा मिळविली.

### नियंत्रण सुटले

काही चालकांचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने एका वळणावर गाड्या संरक्षणासाठी लावलेल्या गवताच्या गंजीत घुसल्या परंतु चालकांनी प्रसंगावधान राखत ताबडतोब नियंत्रण मिळवत रॅली पूर्ण केली. यात २० क्रमांकाची विनित विन्सेन्ट टॉम यांची मारुती जिप्सी प्रथम गवताच्या गंजीत घुसली. त्यानंतर १८ नंबरच्या ऋषिकेश ठाकरसी याने तर गाडीबरोबर गवताची गंजी देखील ओढत नेली. त्यानंतर सिद्धार्थ रांगणेकरही तशाच पद्धतीने गवताच्या गंजीत अडकून पुढे आला. एकाच वळणावर या सर्व गाड्यांचा हा प्रकार झाला असला तरी यामुळे गाडीचे नुकसान अथवा काही अनर्थ देखील घडला नाही, हे सुदैव म्हणावे लागले.

आज सकाळी ७ वाजता ठाणापाडा भागात रॅली होणार आहे. गंगापूररोडमार्गे गिरणारे वाघेरा, हरसूल, खडकओहोळ, जव्हारमार्गे पुन्हा नाशिक अशा मार्गावर स्पर्धा होणार आहे. त्यात ठाणापाडा ते जव्हार या भागात स्पर्धेचा विशेष टप्पा होणार असल्याने या भागातील आदिवासी बांधवांना दरवर्षीप्रमाणे या रॅलीचे आकर्षण आहे.